जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 DEC 2023
पुण्यनगरी

# विद्यापीठात डॉ. आप्पासाहेब पवार यांना अभिवादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या ४२ व्या स्मृतीदिनानिमित्त विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनाच्या प्रवेशद्वारामध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते डॉ. पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

'डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनी'च्या वतीने डॉ. सी. टी. पवार यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड, प्रा. किसनराव कुराडे, डॉ. जे. जी. जाधव, डॉ. मानसिंगराव जगताप, डॉ. जे. पी. माळी, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. के. एम. गरडकर, डॉ. एन. एल. तलवार, डॉ. जे. जे. जाधव, प्रा. टी. के. सरगर, प्रा. सी. एच. भोसले, डॉ. अशोक

जगताप, डी. एच. भादले, अशोक साबळे आदी उपस्थित होते. कुलगुरू शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ अतिथीगृहासमोरील डॉ. पवार यांच्या पुतळ्यासह विद्यार्थी भवनमधील पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागाचे माजी विभागप्रमुख

प्रा. चंद्रकांत भोसले यांचे 'विद्यार्थी भवनचे संस्कार आणि करिअरची जडणघडण' या विषयावर व्याख्यान झाले. करूणा गायकवाड यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. योगेश करचे यांनी सूत्रसंचालन केले. प्रवीण कारंडे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 DEC 2023
सकाळ



कोल्हापूर : डॉ. राकेश कुमार मुदगल, डॉ. विश्वनाथ भोसले यांच्यासमवेत 'अन्वेषण'मध्ये अव्वल स्थान मिळवणाऱ्या सर्गुण तुषार बासराणी व लीना चौधरी.

# 'डी. वाय.'च्या दोघांचे प्रकल्प 'अन्वेषण' महोत्सवात अव्वल

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठात आयोजित 'अन्वेषण' (पश्चिम विभाग) विद्यार्थी संशोधन महोत्सवात डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या दोन विद्यार्थ्यांच्या संशोधन प्रकल्पांना प्रथम क्रमांकाने सन्मानित करण्यात आले.

भारतीय विद्यापीठ महासंघ, दिल्ली (एआययू) आणि शिवाजी विद्यापीठ संगणकशास्त्र अधिविभाग आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्यातर्फे दोनदिवसीय 'अन्वेषण'चे आयोजन केले होते. देशभरातील तरुणाईमध्ये संशोधकीय दृष्टिकोन आणि सृजनशीलता यांना चालना देण्याच्या हेतूने हा उपक्रम राबविला. यामध्ये डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या मूलभूत विज्ञान व उपयोजित विज्ञान विभागात सर्गुण तुषार बासराणी, तर अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागात लीना चौधरी यांच्या 'मेफ्लोक्विन इनहबीटेड एल्गोस्टीरॉइड बायोसेंथेसिस कँडिडा अल्बिकॅन', 'टिश्यु इंजिनिअर्ड ईअर पिना' या दोन प्रकल्पाना प्रथम क्रमांक पटकावला.

या महोत्सवात पदवी स्तरापासून ते पीएचडी संशोधकांपर्यंतच्या अभिनव संकल्पनांवर आधारित संशोधन प्रकल्पांचा समावेश होता. पश्चिम विभागामधील महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, गुजरात व राजस्थान या पाच राज्यांतील ११ विद्यापीठांच्या एकूण १०८ संशोधक विद्यार्थ्यांनी महोत्सवात सहभाग घेतला.

त्यांनी एकूण ६४ संशोधन प्रकल्प सादर केले. यावेळी एआययू सहसंचालक व संशोधन विभागाचे प्रमुख डॉ. अमरेंद्र पाणी, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, एआययूच्या सहाय्यक संचालक डॉ. उषा राय नेगी आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड उपस्थित होते.

या विद्यार्थ्यांना रिसर्च डायरेक्टर डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. अर्पिता तिवारी- पांडे, डॉ. मेघनाद जोशी, डॉ. आश्विनी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल कुलपती डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. आर. के. मुदगल, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

31 DEC 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'डी. वाय. विद्यापीठ'चे विद्यार्थी 'अन्वेषण'मध्ये अव्वल

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठात आयोजित 'अन्वेषण' (पश्चिम विभाग) विद्यार्थी संशोधन महोत्सवात डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचा दोन विद्यार्थ्यांच्या संशोधन प्रकल्पांना प्रथम क्रमांकाने सन्मानित करण्यात आले.

भारतीय विद्यापीठ महासंघ, दिल्ली (एआययू) आणि शिवाजी विद्यापीठ संगणकशास्त्र अधिविभाग आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय 'अन्वेषण' चे आयोजन केले होते. यामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, गुजरात व राजस्थान राज्यांतील ११ विद्यापीठांच्या



कोल्हापुर : डॉ. राकेश कुमार मुदगल, डॉ. विश्वनाथ भोसले यांच्यासमवेत 'अन्वेषण' मध्ये अव्वल स्थान मिळवणाऱ्या सर्गुण तुषार बासराणी व लीना चौधरी.

१०८ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. यामध्ये डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्य मूलभूत विज्ञान व उपयोजित विज्ञान विभागात सर्गुण बासराणी तर अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागात लीना चौधरी यांच्या मेफ्लोक्विन इनहबीटेड एल्गोस्टीरॉइड बायोसेंथेसिस कँडिडा अल्बिकॅन, टिश्यु इंजिनिअर्ड ईअर पिना या दोन प्रकल्पाना प्रथम क्रमांक पटकावला. यावेळी एआययू सहसंचालक व संशोधन विभागाचे प्रमुख डॉ. अमरेंद्र पाणी, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, एआययूच्या सहाय्यक संचालक डॉ. उषा राय नेगी आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड उपस्थित होते.

या विद्यार्थ्यांना रिसर्च डायरेक्टर डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. अर्पिता तिवारी- पांडे, डॉ. मेघनाद जोशी, डॉ. आर्श्विनी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. कुलपती डॉ संजय डी पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. आर. के. मुदगल, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले यांनी अभिनंदन केले.